नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

# प्रेस नोट

दिनांक 03/06/2021 (गुरूवार)
(सकाळ)

---

## विनयभंग

1) पो.स्टे. खापा :– दिनांक 16/05/2021 चे 19.00 वा. दरम्यान फिर्यादी/पीडित वय 32 वर्ष हि घराजवळ नळावर कपडे धुत असतांना आरोपी नामे– सागर श्रावण हेडावु, वय 29 वर्ष, रा. माताखेडी खापा याने पीडितेस मनास लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य करून तिचा विनयभंग केला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. खापा येथे आरोपीविरुध्द कलम 354 (ब) भादंवी. कायद्यान्वये अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. गुन्हयाचा पुढील तपास सफौ विजय बारई मो.क्र. 9822289572 हे करीत आहे.

2) पो.स्टे. पारशिवनी :– दिनांक 01/06/2021 चे 02.30 वा. ते दिनांक 02/06/2021 चे 08.00 वा. दरम्यान फिर्यादी/पीडित वय 30 वर्ष हि लग्न समारंभ आटपुन बच्छेरा गावात आपल्या लहान मुलांसह ऑटोमध्ये बसली होती. त्यादरम्यान आरोपी नामे– सुनिल बाबाराव बावणे रा. कोथुळना याने पीडितेस मनास लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य करून तिचा विनयभंग केला फिर्यादीने विरोध करून आरडा ओरड केला असता आरोपीने तिला ''या घटने बाबत कुणाला सांगितले तर तुझी बदनामी करील'' अशी धमकी दिली. तसेच फिर्यादिचे पती व नातेवाइकांनी आरोपीला फिर्यादीची छेडखानी का केली याबाबत विचारणा केली असता आरोपीने पुन्हा फिर्यादीला व नातेवाईकांना धक्काबुक्की करून शिविगाळ केली व मारण्याची धमकी दिली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. पारशिवनी येथे आरोपीविरुध्द कलम 354, 323, 504, 506 भादंवी. कायद्यान्वये अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि नागुलवार मो.न.9923372647 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर